११ जुलै, २०१६

# प्रसिद्धी पत्रक

## नवीन महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळ, जुलै, २०१६

## ८ जुलै २०१६ च्या राज्य मंत्रिमंडळाच्या विस्तारानंतर नवीन मंत्र्याचे गुन्हेगारी, आर्थिक, शैक्षणिक, लिंग आणि इतर पार्श्वभूमीचे विश्लेषण

असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स
टी-९७ए, सी.एल.हाऊस, १ला मजला,
गुलमोहर कमर्शियल कॉम्प्लेक्सजवळ
गौतम नगर,
नवी दिल्ली -११० ०४९
फोन:+९१-०११-४१६५-४२००
फॅक्स:+९१-११-४६०९-४२४८
इमेल:adr@adrindia.org

### संक्षेप आणि ठळक मुद्दे

असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म्स (एडीआर) आणि महाराष्ट्र इलेक्शन वॉच यांनी ८ जुलै २०१६ रोजी नंतर झालेले महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाच्या विस्तारानंतर १० नवीन मंत्र्याचे प्रतिज्ञापत्रांचे विश्लेषण केले, ज्यामुळे मंत्रिमंडळात मंत्र्यांची संख्या आता ३९ झाली आहे. ह्या मंत्र्यांमध्ये मुख्यमंत्री चा पण समावेश आहे आणि हे मंत्री विधान सभा व विधान परिषदेचे सभासद आहे.

### गुन्हेगारी पार्श्वभूमी:

- गुन्हेगारी प्रकरणं असलेले मंत्री : नवीन झालेले मंत्र्यांमध्ये श्री महादेव जानकर ह्यांना सोडून बाकीचे सर्व ९ मंत्र्यांवर गुन्हे दाखल आहे, असे त्यांच्या प्रतिज्ञापत्रांद्वारे समजून येतो. एकूण ३९ मंत्रांच्या प्रतिझापत्राचे विश्लेषण केल्यानंतर असे दिसून येते की त्यांमधून २५ (६४%) मंत्र्यानी स्वतः वर त्याच्या विरोधात गुन्हेगारी प्रकरण दाखल असल्याचे घोषित केले आहे.

- गंभीर गुन्हेगारी प्रकरण असलेले मंत्री: नवीन झालेले १० मंत्र्यांमधून ८ मंत्र्यांवर गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहे, असे त्यांच्या प्रतिज्ञापत्रांदवारे समजून येतो. एकुण ३९ मंत्र्यांच्या प्रतिझापत्राचे विश्लेषण केल्यानंतर असे दिसून येते की त्यांमधून १८ (४६%) मंत्र्यानी स्वतः वर त्याच्या विरोधात गंभीर स्वरुपाचे गुन्हेगारी प्रकरण म्हणजे खुनाचा प्रयत्न, अपहरण, डाका/दरोडा, दंगल करणे, धमकावणे, इत्यादींसारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल असल्याचे घोषित केले आहे.

### आर्थिक पार्श्वभूमी

- कोट्यधीश उमेदवार: विश्लेषित केलेल्या ३९ पैकी ३२ (८२%) उमेदवार कोट्यधीश आहेत, आणि ह्यांच्यामध्ये ८ नवीन मंत्र्यांचा समावेश आहे.

- सरासरी मालमत्ता: विस्तारित नवीन महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाच्या प्रत्येक मंत्र्यांची सरासरी मालमत्ता रु. १०.३५ कोटींपेक्षा जास्त आहे, ज्यामध्ये १० नवीन मंत्र्यांची सरासरी मालमत्ता रु. ७.४७ कोटी आहे, असे दिसून येते.

[टीप : मंत्रांच्ये आर्थिक पार्श्वभूमीबदद्ल जास्त माहितीसाठी सोबत जोडलेला सविस्तार इंग्रंजी अहवाल वाचा. ]

इतर पार्श्वभूमीची माहिती:

- मंत्र्याची शैक्षणिक माहिती: १५ (३८%) मंत्र्यानी १२ वी पास किंवा त्यापेक्षा कमी शिक्षण असल्याचे तर २२ (५६%) मंत्र्यानी पदवी किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षण असल्याचे घोषित केले आहे.
- मंत्र्याची वयाची माहिती: ४ मंत्र्यानी त्यांचे वय २५ ते ४० च्या दरम्यान असल्याचे, १४ मंत्र्यानी त्यांचे वय ४१ ते ५० च्या दरम्यान असल्याचे, १५ मंत्र्यानी त्यांचे वय ५१ ते ६० च्या दरम्यान असल्याचे तसेच ६ मंत्र्यानी त्यांचे वय ६१ वर्षाच्या वर असल्याचे घोषित केले आहे.
- उमेदवारांची लिंगविषयक माहिती: विश्लेषित केलेल्या ३९ मंत्र्यामध्ये फक्त २ (५%) महिला आहेत.

## संपर्क

## महाराष्ट्र इलेक्शन वॉच

| अजित रानाडे | शरद कुमार | दीपक नेगी |
|---|---|---|
| **संस्थापक सदस्य**,<br>नॅशनल इलेक्शन वॉच,<br>असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स.<br>+९१-९७०२२-१५३१२<br>ajit.ranade@gmail.com | **राज्य समन्वयक**<br>महाराष्ट्र इलेक्शन वॉच<br>+९१-९८६९४-०३७२१<br>sharadkumar40@gmail.com | **वरिष्ठ कार्यकारी सहाय्यक**<br>असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स<br>+९१-९८९२४-०३१८६<br>deepak@adrindia.org |

## नॅशनल इलेक्शन वॉच/असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स

| मिडीया आणि पत्रकारांसाठी हेल्पलाईन | मे.जन.अनिल वर्मा (सेवानिवृत्त) | प्रा. जगदीप चोक्कर | प्रा. त्रिलोचन शास्त्री |
|---|---|---|---|
| +९१ ८०१०३ ९४२४८<br>ईमेल: adr@adrindia.org | **प्रमुख**<br>नॅशनल ईलेक्शन वॉच,<br>असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स<br>०११ ४१६५ ४२००<br>+९१ ८८२६४ ७९९१०<br>adr@adrIndia.org,<br>anilverma@adrindia.org | आयआयएम अहमदाबाद (सेवानिवृत्त)<br>**संस्थापक सदस्य**,<br>नॅशनल ईलेक्शन वॉच,<br>असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स<br>+९१ ९९९९६ २०९४४<br>jchhokar@gmail.com | आयआयएम बँगलोर<br>**संस्थापक सदस्य**,<br>नॅशनल ईलेक्शन वॉच,<br>असोसिएशन फॉर डेमॉक्रेटिक रिफॉर्म्स<br>+९१ ९४४८३ ५३२८५<br>trilochans@iimb.ernet.in |

Maharashtra Election Watch

# डिसक्लेमर

मंत्र्यांबद्दल या अहवालात दिलेली माहिती ही त्यांनी निवडणूक अधिकारी (सीईओ), महाराष्ट्र यांना सदर केलेल्या प्रतिज्ञापत्रातून घेतलेली आहे.निवडणूक आयोगाने माहितीमध्ये काही बदल केल्याशिवाय असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म्स (एडीआर) उपरोक्त माहिती मध्ये कसलेही कमी-अधिक बदल करत नाही. विशेष करून इतर कुठल्याही स्त्रोताकडून मिळालेली अप्रमाणित माहिती अजिबात वापरली जात नाही. प्रतिज्ञापत्रांच्या प्रती मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या संकेत स्थळावरून (http://ceo.maharashtra.gov.in) मिळालेल्या आहेत. सगळी माहिती निवडणुकीतील प्रतिज्ञापत्रांबरहुकूमठेवली जावी यासाठी जरी सर्वतोपरी प्रयत्न केले असले तरी या अहवालातील माहिती आणि निवडणुकीतील मंत्र्यांनी सादर केलेली प्रतिज्ञापत्रे यांमधील माहिती मध्ये काही विसंगती आढळल्यास प्रतिज्ञापत्रांतील माहिती बरोबर मानावी. प्रकाशनाच्या प्रक्रियेदरम्यान या अहवालामध्ये काही दोष निर्माण झाल्यास त्यासाठी असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म्स, महाराष्ट्र इलेक्शन वॉच आणि त्यांचे स्वयंसेवक कुठल्याही प्रकारे जवाबदार असणार नाहीत.